**उलटतपास गैरअर्जदारातर्फे श्री. आर.एल. वडकीले वकील यांचेकडूनः–**

**०१–** हे म्हणणे बरोबर आहे की, माझे माहेर व सासर एकाच गावात आहे. हे म्हणणे बरोबर आहे की, माझ्या जन्मापासून ते लग्नहोईपर्यंत मी अकोली गावात राहिले. हे म्हणणे बरोबर आहे की, कोंडीरामचा देखील जन्म अकोली येथे झाला व तेथेच तो लहानचा मोठा झाला. हे म्हणणे बरोबर नाही की, आम्ही एकाच समाजाचे असल्यामुळे आम्हाला कळते तेंव्हापासून आम्ही एकमेकास ओळखतो. हे म्हणणे बरोबर आहे की, अकोली गावची लोकसंख्या हजार ते दिड हजार असेल. हे म्हणणे बरोबर आहे की, लग्नापूर्वी आमची एकमेकाला पसंती होती म्हणून घरच्या लोकांनी आमचे लग्न लावले. हे म्हणणे बरोबर आहे की, माझ्या बद्दलची संपूर्ण माहिती घेवून कोंडीराम लग्नाला तयार झाला.

**०२–** हे मला माहीत नाही की, आमच्या गावात जाडे, पोले, गादेकर व गिरी आडनावाचे लोक रहातात. साक्षीदार स्वतःहून सांगते की, आम्ही शेतात रहातो. आमचे शेत व गावात दोन किं.मी.चे अंतर आहे. मी गावात कोणाच्याही सुख दुखात जात नव्हते. हे म्हणणे बरोबर आहे की, कोंडीराम सोबत लग्न झाल्यांनतर दोन ते तीन वर्षात आमच्या वाद सुरु झाले. हे म्हणणे बरोबर नाही की, माझे केशव गिरी नावाचे व्यक्तीसोबत अनैतिक संबंध होते व त्याची माहिती कोंडीरामला झाल्यामुळे आमच्या वाद सुरु झाले. हे म्हणणे बरोबर नाही की, माझे केशव गिरी सोबत असलेले अनैतिक संबंधाची बाब कोंडीरामने माझ्या आईवडीलांच्या निदर्शनास आणुन दिली होती व त्यामुळे आमच्या बैठका देखील सुरु झाल्या होत्या. हे म्हणणे बरोबर नाही की, माझ्या अनैतिक संबंधामुळे कोंडीराम मला घेवून जात नव्हता म्हणून मी त्याचेविरुध्द कारवाया केल्या होत्या.

Digitally signed by YADAV GAJANAN BHANUDAS
Date: 2026.07.16 16:04:35 +0530

**०३–** हे म्हणणे बरोबर आहे की, कोंडीराम व माझ्या तडजोड झाल्यामुळे तो मला नांदवायला घेवून आला. हे म्हणणे बरोबर आहे की, कोंडीराम कन्फेशनरीचे दुकान चालवत

होता. हे म्हणणे बरोबर नाही की, त्याच्या व्यवसायामुळे, मुलाचे शिक्षणामुळे आम्ही गंगाखेडलाच वास्तव्यास होतो. हे म्हणणे बरोबर नाही की, मी कोंडीरामसह नागेश पैठणकर यांचेकडे किरायाणे रहात होते. हे म्हणणे बरोबर नाही की, नागेश पैठणकर यांचेकडे रहात असतांना तेथे रहाणारा रवी उडनशिव यांचेसोबत माझे अनैतिक संबंध आले. हे म्हणणे बरोबर नाही की, कोंडीराम हा सकाळी ९.०० वाजता दुकान उघडायला जात होता व रात्री १०.०० वाजता परत घरी येत होता. तो दुपारी १२.०० वाजता जावून रात्री ८.०० ते ९.०० वाजता परत येत होता.

**०४–** हे म्हणणे बरोबर नाही की, दिनांक ०८.०४.२०२४ रोजी कोंडीराम दुकानावर गेलेला आहे असे समजून मी रवी उडनशिवला माझ्या घरी अनैतिक संबंध करण्यासाठी बोलाविले. हे म्हणणे बरोबर नाही की, कोंडीराम त्या ठिकाणी अचानक आला व त्याने दार लोटला असता, आम्ही त्या नको त्या अवस्थेत दिसुन आलो. हे म्हणणे बरोबर नाही की, मी त्याच वेळेस कपडे परिधान करुन पुन्हा अशी चूक होणार नाही अशी माझी कोंडीरामकडे मागितली.

**०५–** हे म्हणणे बरोबर आहे की, माझ्या भावाचे नाव गोकूळ प्रभु वानी आहे. हे म्हणणे बरोबर नाही की, कोंडीरामने आम्हाला नको त्या अवस्थेत पाहून माझा भाऊ गोकूळ यास फोन करुन बोलावले होते. हे म्हणणे बरोबर नाही की, गंगाखेड येथे इज्ञतीचा पंचनामा होऊ नये म्हणून माझा भाऊ मला घेवून गावी गेला.

**०६–** हे म्हणणे बरोबर नाही की, मी रवी उडनशिव सोबत अनैतिक संबंध ठेवले म्हणून कोंडीराम याने मला दिनांक २०.०४.२०२४ रोजी फारकतीची नोटीस पाठविली. हे म्हणणे बरोबर आहे की, मला ती नोटीस दिनांक २४.०४.२०२४ रोजी प्राप्त झाली. हे म्हणणे बरोबर नाही की, मी सध्या माझ्या माहेरी रहात आहे. साक्षीदार स्वतःहून सांगते सासरी रहाते. कोंडीराम माझ्या चरीत्रयावर संशय घेतो या कारणाने मी पोलीस ठाण्यात

DISTRICT COURTS MAHARASHTRA
सत्यमेव जयते
Digitally signed by
YADAV GAJANAN
BHANUDAS
Date: 2026.07.16
16:04:43 +0530

तक्रार दिलेली नाही. हे म्हणणे बरोबर आहे की, मी नोटीसचे देखील उत्तर दिले नाही. हे म्हणणे बरोबर नाही की, कोंडीरामला माझ्याकडून व्यभिचाराच्या कारणावरुन फारकत पाहिजे व ती त्यास मिळू नये म्हणून मी खोटी साक्ष देत आहे. हे म्हणणे बरोबर नाही की, खोटे सरतपासणीची शपथ पत्र दाखल केले आहे व आज रोजी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपासपूर्ण.**

श्रवणोत्तर स्वीकृत,

Digitally signed by YADAV GAJANAN BHANUDAS
Date: 2026.07.16 16:04:50 +0530

**( जी.बी. यादव )**,

दि.१६.०७.२०२६

दिवाणी न्यायाधीश, वरिष्ठ स्तर,
गंगाखेड.